<u>विशेष दिवाणी दावा क्र.२९/२०२५ मधील निशाणी क्र.६ खालील आदेश</u>
<u>[शेख जलील विरुध्द अन्सारी व इतर]</u>

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे वाद मिळकतीसंदर्भात जैसे थे ठेवा परिस्थितीत कायम ठेवणे संदर्भात दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीतर्फे विधीज्ञ हजर झाले आहेत.

२. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा चल संपत्तीबाबत करारपुर्तीसाठी वाद मिळकतीसंदर्भात दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे व प्रतिवादी वाद मिळकत त्रयस्त हितसंबंध करु इच्छीत आहेत व तसेच वादीच्या वाद मिळकतीच्या ताब्यात हरकत व अडथळा निर्माण करीत आहेत. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी युक्तीवाद सांगितले की, प्रतिवादीने वादी विरोधात याच वाद मिळकतीसंबंधी नियमीत दिवाणी क्र.३०/२०२५ प्रतिवादी विरोधात दाखल केला असून तो आजच्या बोर्डावर आदेशासाठी आहे व प्रतिवादी वाद मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. तसेच प्रतिवादीचे नाव महसुल अभिलेखात वाद मिळकतीसंदर्भात लागलेले आहे व नोंदलेले आहे. वादीतर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवात सांगितले की, प्रतिवादी यांनी वादीस वाद मिळकतीसंदर्भात विधीज्ञा मार्फत नोटीस पाठवली असून त्यामध्ये प्रतिवादींनी वादीचा ताबा मान्य केला आहे. तसेच वादींच्या हक्कात वाद मिळकतीसंदर्भात यापुर्वीच्या प्रकरणात जैसे थे ठेवा परिस्थितीबाबत आदेश पारीत झालेला आहे. त्यामुळे तो आदेश कायम करण्यात यावा.

३. संचीकेचे अवलोकन केले. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी म्हणत असल्याप्रमाणे त्याचा वाद मिळकतीवर काय म्हणुन ताबा आहे हे कागदपत्रावर व आलेल्या पुराव्यावरुन ठरेल सद्यस्थितीत याबाबतीत जास्त उहापोह करण्याची आवश्यता नाही. वादीने वाद मिळकतीवर त्याचा ताबा असल्याबाबत महसुल अभिलेखावरील दस्त सद्यस्थितीत कागदपत्रासमवेत दाखल केलेला नाही. अदयाप प्रतिवादींचे निशाणी क्र५ वर म्हणणे येणे बाकी

आहे व प्रतिवादींना त्याची संधी मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. जरी तशी संधी दिली तरी वादीचे नुकसान नाही व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणे सोपे होईल. सद्यस्थितीत अर्ज मंजुरीकरीता सबळ कारण नाही करिता आदेश.

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज निशाणी क्र.६ नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by SUSHIL SHARADRAO DESHMUKH
Date: 2025.07.18 12:25:55 +0530

(सु. श. देशमुख)

दिनांक : १८/०७/२०२५.　　　दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सिल्लोड.